# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२२

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### परभणी जिल्ह्यात तालुकास्तरीय क्रीडा संकुल उभारण्याकरीता पाटबंधारे विभागाची जागा देण्याबाबत

**(१) १०६९४ (२३-११-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी, सोनपेठ, परभणी व मानवत (जि.परभणी) या तालुक्यात तालुकास्तरीय क्रीडा संकुल उभारण्याबाबत जागा उपलब्ध नसल्याने पाटबंधारे विभागाची जागा विनामुल्य तत्वावर देण्यात यावी अशी मागणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वरील चारही ठिकाणी तालुका क्रीडा संकुल उभारणीसाठी १०० वर्षाच्या कराराने विनामुल्य किंवा लिजवर पाटबंधारे विभागाची जागा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (१५-१२-२०२१) :** (१) याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८/१०/२०२१ रोजी चे निवेदन मा.जलसंपदा मंत्री यांना दिले आहे.
(२) पाथरी, सोनपेठ, परभणी व मानवत (जि.परभणी) या तालुका क्रीडा संकुलासाठी, क्रीडा विभागास जागा उपलब्ध करुन घेणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कल्याण (जि.ठाणे) येथील आधारवाडी कारागृहातील कैद्यांनी जेलर व शिपायावर हल्ला केल्याबाबत

**(२) १०७३६ (०६-१२-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (जि.ठाणे) येथील आधारवाडी कारागृहातील कैद्यांच्या बराक्यांची तपासणी करण्यासाठी गेलेल्या जेलर व शिपायावर दोन कैद्यांनी मिळून धारदार हत्यारांनी वार केल्याची घटना दिनांक १२ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हल्लेखोर कैद्यांविरुध्द पोलिसांनी कोणता गुन्हा दाखल केला आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हल्लेखोर कैद्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१०-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) घटनेशी संबंधित दोन्ही बंद्याविरुध्द खडकपाडा पोलीस स्टेशन, कल्याण येथे गु.र.क्र.२८१/२१ भादंवि कलम ३५३,३३२,३३३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच दोन्ही बंद्यांनी केलेल्या गैरवर्तनामुळे सुरक्षिततेच्या कारणास्तव त्यांना दिनांक १०/०९/२०२१ रोजी कल्याण जिल्हा कारागृहातून तळोजा मध्यवर्ती कारागृह, नवी मुंबई येथे वर्ग करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नवी मुंबईत वाहतूक कोंडी होत असल्याने अवजड वाहनांकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(३) १०७६२ (१७-११-२०२१) श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई, शीळफाटा, मुंब्रा बाय-पास रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने गुजरातकडे जाणारी अवजड वाहने महापे ऐरोली मार्गे वळविण्यात आली आहेत, तसेच गुजरातवरुन येणारी अवजड वाहनांची वाहतूक ठाणे कोपरी मार्गी महापेवरून करण्यात आल्यामुळे महापे ते ऐरोली टोल नाक्यापर्यंत सतत वाहतूक कोंडी होत असल्याने नवी मुंबईत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक अवजड वाहने महापे ऐरोली उनरुली मार्गे मुंबई मिरा-भाईंदर तसेच पुढे अहमदाबाद महामार्गाने जात असून ठाणे-बेलापूर मार्गावर अवजड वाहने चालविता येतील तेवढया रुंदीचे रस्ते आहेत, परंतु रबाळे पोलीस ठाण्यासमोरील पुलाखालून वळण घेत ऐरोली दिवा नाका या रस्त्यावर वाहतूक क्षमता नसून तेथील रस्ते खराब असल्याने त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाहतूक कोंडीमुळे संध्याकाळच्या वेळेस ठाणे-बेलापूर महामार्गावर कळव्यापासून वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असल्यामुळे वाहनचालकांना विनाकारण मनस्ताप सहन करावा लागतो तसेच, या वाहतूक कोंडीत रुग्णवाहिका देखील अडकून पडत असल्याने नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खराब रस्त्यामुळे अनेक नागरिकांना त्रास होत असल्याने शासनाने अवजड वाहनांसाठी कोणती उपायोजना केली आहे, वा करण्यात येत आहे, तसेच त्याबाबत नवीन काय प्रयोजन करण्यात आले आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१६-१२-२०२१) :** (१) व (२) मुंब्रा बायपास रस्ता सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे या कार्यालयाच्या अखत्यारित येत असून सदर रस्त्यावरील खड्डे हे खडी मिश्रीत डांबराने भरुन दुरुस्त करण्यात आले असून रस्ता वाहतूकीस सुस्थितीत करण्यात आलेला आहे.

मुंब्रा बायपास रस्त्याचे दुरूस्तीकरीता दिनांक २९/०७/२०२१ ते दिनांक १६/०८/२०२१ या कालावधीमध्ये तळोजा ते शिळफाटा लेन वाहतूकीस बंद करण्यात आल्याने महापे ते ऐरोली टोल नाक्यापर्यंत वाहतूक कोंडी होत होती.

या कालावधीमध्ये योग्य तो पोलीस बंदोबस्त नेमुन वाहतूक कोंडीचे नियोजन करण्यात आले होते.

(३) वाहतूक कोंडीत रुग्णवाहिका अडकल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केल्याची कोठेही नोंद नाही.

(४) जे.एन.पी.टी. बंदरातून कंटेनर वाहतूक करणारी वाहने व इतर सर्व प्रकारच्या अवजड वाहनांना नवी मुंबई पोलीस आयुक्तालायातील सर्व मार्गावरून सकाळी ०६.०० वा. ते रात्री २३.०० वाजेपर्यंत पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्या दिनांक २५/०९/२०२१ रोजीच्या आदेशान्वये वाहतूकीस पूर्णत: बंदी करण्यात आली होती.

तथापि, सदरच्या अवजड वाहतूकीस असलेली बंदी सुधारित आदेश दिनांक १८/१०/२०२१ अन्वये दुपारी १२ ते ४ दरम्यान शिथील केलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## डोंबिवली (जि.ठाणे) पश्चिमेकडील भागात अवैधरित्या वाळू उपसा सुरु असल्याबाबत

**(४) १०८१८ (२३-११-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) पश्चिमेकडील रेतीबंदर, मोठागाव, गणेशनगर व देवीचापाडा भागातील खाडीकिनारी लहान-मोठ्या बोटींद्वारे, सक्शन पंप आणि ड्रेजरद्वारे वाळू उपसा सुरु असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डोंबिवली पश्चिम येथील देवीचापाडा येथील खाडीकिनारी अवाढव्य ड्रेजर वाळू माफियांनी आणून ठेवले असून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या ड्रेजरच्या सहाय्य्याने उपसा झालेली वाळू लहान बोटींद्वारे डम्परमध्ये भरुन चोरी केली जाते तसेच तेथील झाडाझुडपाचा आधार घेऊन लपविली जात असल्याची तक्रार पर्यावरणप्रेमीनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवैध वाळू उपसामुळे शासनाचा महसूल बुडत असल्याने उक्त वाळू माफिया व त्यांना सहकार्य करणाऱ्या प्रशासनातील दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाळू माफिया व त्यांना सहकार्य करणाऱ्या दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करुन अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) ठाणे जिल्ह्यातील अनधिकृत वाळू उपसा रोखणेकामी जिल्हास्तरावर/ उपविभागीय स्तरावर तसेच तालुकास्तरावर नियुक्त करण्यात आलेल्या दक्षता पथकांमार्फत वेळोवेळी कडक मोहिम राबविण्यात येते. त्यानुसार ठाणे जिल्ह्यात दिनांक ०१/०४/२०२१ ते दिनांक ३०/१०/२०२१ या कालावधीत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या १११ प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रुपये १७८.५८ लाख इतकी रक्कम शासनजमा करण्यात आली आहे. तसेच ७ प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्हयातील रेतीगटांचे लिलाव रखडल्याबाबत

**(५) १०८२९ (२३-११-२०२१) श्री.जयंत पाटील** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयात यांत्रिकी ड्रेझरद्वारे रेती उपसा करणारे १६ प्रमुख, ६३ उप रेती गट, हातपाटीद्वारे रेती उपसा करणारे ११ प्रमुख व ५७ उपगट असून या वाळू व्यावसायिकांमधील वाद आणि शासकीय धोरणामुळे रेती उत्खननाचे लिलाव मागील दोन वर्षापासून रखडल्यामुळे शासनाचे कोट्यवधी महसूल बंद झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेती उत्खननाच्या लिलावासाठी शासनाने ठरविलेली वाळूची किंमत अधिक असल्याने रेती व्यावसायिक लिलावासाठी पुढे येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रेती लिलाव केवळ १ वर्षासाठी असल्यामुळे व्यावसायिकांना नुकसान सहन करावे लागत आहे, त्यामुळे किमान सलग ३ वर्षाचे एकत्रित लिलाव करण्याची मागणी वाळू व्यावसायिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रायगड जिल्हयातील रेती उत्खननाचे लिलाव सुरळीत सुरु ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०७-१२-२०२१) :** (१) व (२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) रेती लिलाव केवळ १ वर्षासाठी असल्यामुळे वाळू व्यावसायिकांना नुकसान सहन करावे लागत असल्याची बाब निदर्शनास आली नाही. तथापि, लिलाव कालावधी ३ वर्षासाठी करण्याची मागणी वाळू व्यावसायिकांनी केली आहे.

(४) सन २०२१-२२ करीता अपसेट प्राईस निश्चित करुन यांत्रिकी पध्दतीने उत्खननासाठी राखीव लिलाव गटाकरीता ई-लिलाव प्रक्रिया राबविणे तसेच डुबी/ हातपाटीद्वारे उत्खननासाठी राखीव गटाकरीता परवाना पध्दतीने वाळू/ रेती निर्गती करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील दिवंगत स्वातंत्र्यसैनिक यांच्या पत्नीचे निवृत्ती वेतन देण्याबाबत

**(६) १०८४९ (२४-११-२०२१) श्री.जयंत पाटील, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील दिवंगत स्वातंत्र्यसैनिक लक्ष्मण चव्हाण यांच्या ९० वर्षीय पत्नी शालिनी चव्हाण यांचे निवृत्ती वेतन ५६ वर्षापासून रोखली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची मा.न्यायालयाने दखल घेत याचिकाकर्त्या स्वातंत्र्यसैनिक लक्ष्मण यांच्या पत्नी यांची निवृत्ती वेतन इतक्या दीर्घकाळ रोखणे योग्य नसल्याचे स्पष्ट केले असून याप्रकरणी चार दिवसात शासनाने योग्य तो निर्णय घ्यावा असे निर्देश मा.उच्च न्यायालयाने दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्वातंत्र्य सैनिक निवृत्ती वेतन योजनेचा लाभ मिळावा यासाठी सन २०१६ मध्ये जिल्हाधिकारी, रायगड आणि राज्य शासनाकडे पत्रव्यवहार करुनही त्यावेळी त्यांच्या दाव्याच्या पडताळणीचे आणि त्यांचा अहवाल सादर करण्याचे आदेश राज्य शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिवंगत स्वातंत्र्यसैनिक यांच्या पत्नीचे निवृत्ती वेतन रोखणाऱ्यांवर कारवाई करुन त्यांचे निवृत्ती वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०९-१२-२०२१) :** (१) व (२) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट याचिका क्र. २००७४ /२०२१ शालिनी चव्हाण वि. महाराष्ट्र शासन व इतर या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०७/१०/२०२१ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड यांनी या प्रकरणी आवश्यक पुरावे जमा करून राज्य शासनास सादर करावेत. त्या आधारे शासनाने यथोचित निर्णय घ्यावा. तसेच याचिकाकर्तीचे वय लक्षात घेता या प्रकरणीच्या अंतिम निर्णयास अधीन राहून याचिकाकर्तीस ऑक्टोबर, २०२१ पासून तात्पुरत्या स्वरूपाचे स्वातंत्र्य सैनिक निवृत्तीवेतन मंजूर करावे, असे अंतरीम आदेश दिलेले आहेत.

(३) होय, खरे आहे.

(४) श्रीम. शालिनी लक्ष्मण चव्हाण यांनी सादर केलेल्या कै. लक्ष्मण रामचंद्र चव्हाण यांच्या जेल प्रमाणपत्राबाबतचा अधीक्षक, जिल्हा कारागृह वर्ग-१, भायखळा, मुंबई यांचा पडताळणी अहवाल नकारार्थी असल्यामुळे शासन निर्णय दिनांक ०४/०७/१९९५ व दिनांक ०२/०६/२०१६ मधील तरतूदींनुसार स्वातंत्र्य सैनिक निवृत्तिवेतन मंजूर करणेबाबतचा प्रस्ताव मा.मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती यांच्या मान्यतेने नामंजूर करण्यात आला होता. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वणी (जि.यवतमाळ) येथे बेकायदरेशीररित्या बालकाची विक्री होत असल्याबाबत

**(७) १०८६५ (२३-११-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी (जि.यवतमाळ) येथे बाळ दत्तक साठी उपलब्ध असल्याचा मॅसेज प्रसारित (व्हायरल) केले असता २१ दिवसाच्या बालकाची विक्री होत असल्याचा प्रकार यवतमाळ व अकोला येथे स्ट्रींग ऑपरेशनद्वारे दिनांक ३ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बालकांची विक्रीचे प्रकार करणाऱ्या टोळीवर कारवाई करुन बाल विक्री रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१५-१२-२०२१) :** (१) वणी (जि.यवतमाळ) येथे बाळ दत्तक साठी उपलब्ध असल्याचा संदेश व्हॉटस्अॅप ग्रुपवर प्रसारित करून, २१ दिवसाच्या बालकाची विक्री करण्याच्या प्रयत्नात असलेल्या टोळीवर दिनांक ३०/०९/२०२१ रोजी वणी पोलीस स्टेशन जि.यवतमाळ यांच्याकडून कारवाई करण्यात आली आहे.
(२) वणी (जि.यवतमाळ) येथे बालकाची विक्री करणाऱ्या ७ आरोपींच्या टोळीवर वणी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ७५७/२०२१, भा.द.वि. कलम ३७०, ३४ बालन्याय संरक्षण अधिनियम, २०१५ चे कलम ८१, ८७ अन्वये दिनांक ३०/०९/२०२१ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील ७ आरोपींना अटक करण्यात आली असून सदरहू ७ आरोपींविरूध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र क्र. १७१/२०२१ अन्वये दिनांक २९/११/२०२१ रोजी दोषारोप दाखल करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डोंबिवली (जि.ठाणे) परिसरातील मुलीला लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केल्याबाबत

**(८) १०८८१ (२३-११-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवली (जि.ठाणे) परिसरातील ग्रामीण भागात राहणाऱ्या १५ वर्षाच्या मुलीला लग्नाचे आमिष दाखवून ३३ नराधमानी माहे जानेवारी, २०२१ ते सप्टेंबर, २०२१ या कालावधीत अत्याचार केल्याची घटना दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पिडीत मुलीचे अश्लील व्हिडीओ काढून प्रसिध्द (व्हायरल) करण्याची धमकी देवून आरोपी पिडीतेला ब्लॅकमेल करीत असल्याची तक्रार पिडीत मुलीने मानपाडा पोलीस स्टेशन मध्ये नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणात किती आरोपींना अटक करण्यात आली आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अत्याचार प्रकरणी दोषी आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१५-१२-२०२१) :** (१) डोंबिवली परिसरातील राहणाऱ्या १५ वर्षाच्या पिडीत मुलीला अतिप्रसंग करताना काढलेला व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन वारंवार सामुहिक केला म्हणून मानपाडा पोलीस स्टेशन येथे दिनांक २३/०९/२०२१ रोजी गु.र.क्र. ४९९/२०२१, भा.द.वि. कलम ३७६, ३७६ (२)(एन), ३७६ (३), ३७६ (ड)(अ), पोक्सो कलम ४, ६, १०, माहिती तंत्रज्ञान अधिनियमाचे कलम ६७ (अ)(ब) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मानपाडा पोलीस स्टेशन येथे दाखल गु.र.क्र. ४९९/२०२१ मध्ये २९ आरोपींना अटक करण्यात आली आहे आणि ४ विधिसंघर्षित बालकांना ताब्यात घेण्यात आले असून एका आरोपीचा शोध सुरू आहे.

(४) याबाबत मानपाडा पोलीस स्टेशन येथे दिनांक २३/०९/२०२१ रोजी गु.र.क्र. ४९९/२०२१, भा.द.वि. कलम ३७६, ३७६ (२)(एन), ३७६ (३), ३७६ (ड)(अ), पोक्सो कलम ४, ६, १०, माहिती तंत्रज्ञान अधिनियमाचे कलम ६७ (अ)(ब) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात २९ आरोपींना अटक करण्यात आली आहे आणि ४ विधिसंघर्षित बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे. सदर आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपत्र दाखल करण्यात आले असून एका आरोपीचा शोध सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील बंजारा समाजाच्या तांड्यांना महसूली गावांचा दर्जा देण्याबाबत

**(९) १०९७१ (२३-११-२०२१) श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बंजारा समाजाच्या तांड्यांना महसूली गावाचा दर्जा नसल्यामुळे या तांड्यांना रस्ते, पाणीपुरवठा, वीज इत्यादी मूलभूत सुविधांपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तांड्यांना (बंजारा वस्ती) महसूली दर्जा देण्याबाबत शासनामार्फत सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बंजारा समाजाच्या तांड्यांना महसूली गावाचा दर्जा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१५-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४ पोट-कलम (१) खंड (सहा) मध्ये ३०० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या वाड्या/तांडे/वस्त्या यांना स्वतंत्र महसूली गावांचा दर्जा देण्याबाबत तरतूद आहे. त्याबाबतचे शासनाचे अधिकार शासन अधिसूचना क्र.टिएलसी/ १०७६/ ६३९२३/ म-६, दिनांक ०१/०७/१९७६ अन्वये जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी यांचे स्तरावर प्राप्त प्रस्तावांवर नियमोचित कार्यवाही करण्यात येते.

राज्यातील बहुतांश ठिकाणी बंजारा समाजाच्या पात्र तांड्यांना महसुली गावाचा दर्जा देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. नाशिक विभागातील ९ पात्र तांड्यांना महसूली दर्जा देण्याची कार्यवाही अंतिम झालेली

आहे. औरंगाबाद विभागात २७ व नागपूर विभागात ४ बंजारा समाजाच्या पात्र तांड्यांना स्वतंत्र महसूली गावाचा दर्जा देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात निर्भया योजनेंतर्गत निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(१०) ११०८१ (२४-११-२०२१) श्री.अंबादास दानवे** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महिलांच्या सुरक्षिततेसाठी विशेष आर्थिक पॅकेज म्हणजेच निर्भया फंडाची घोषणा सन २०१३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात झाली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निर्भया फंडाची रक्कम केंद्राकडून राज्याला देण्यात येते, योजनेंतर्गत काही योजना केंद्राच्या तर काही योजना राज्य शासन राबवित असते, परंतु योजनांचा फायदा/वापर/अंमलबजावणी राज्यात होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खेर आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेंतर्गत देण्यात आलेला ८० टक्के निर्भया फंड वापराविना पडून आहे, हे ही खरे आहे कय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निधीचे वितरण व लाभार्थ्यांमध्ये वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१७-१२-२०२१)** : (१) होय. महिला सुरक्षितते बाबतच्या योजना निर्भया निधी अंतर्गत राबविण्यात येत आहेत.
(२) निर्भया निधीअंतर्गत पुढील पाच योजना राबविण्यात येत आहेत-

१. मुंबई शहर महिला सुरक्षितता पुढाकार योजना.
२. महिला मदत कक्ष.
३. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष.
४. सायबर क्राईम प्रिव्हेन्शन फॉर वूमन ॲण्ड चिल्ड्रन.
५. डिएनए लॅबचे बळकटीकरण.

यामधील मुंबई शहर महिला सुरक्षितता पुढाकार योजना या योजनेच्या निधीमध्ये केंद्र शासन आणि राज्य शासन यांचा हिस्सा ६०:४० असा आहे. उर्वरित ४ योजनांच्या निधीमध्ये केंद्र शासनाचा १००% हिस्सा आहे. तसेच, सायबर क्राईम प्रिव्हन्शन फॉर वूमन ॲण्ड चिल्ड्रन या योजनेची अंमलबजावणी पूर्ण झाली आहे. अन्य ४ योजनांची अंमलबजावणी सुरू आहे.

(३) व (४) केंद्र शासनाकडून निर्भया योजनेंतर्गत प्राप्त होणारा निधी वितरीत करण्याची आणि सदरील योजनांच्या अंमलबजावणीची कार्यवाही शासन स्तरावरून सुरू आहे.

सदरील ५ ही योजनांचा निधी हा महाराष्ट्र पोलीस दलाच्या आधुनिकीकरण आणि सक्षमीकरणास उपलब्ध करून देण्यात येतो. यामधील कोणत्याही योजनेमध्ये वैयक्तिक लाभार्थ्यास निधी उपलब्ध करून देण्यात येत नाही.

क) मुंबई शहर महिला सुरक्षितता पुढाकार योजनेचा आराखडा अंतिम करण्याची आणि अंतिम करण्यात आलेला आराखडा केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

ख) पिडीत महिलांच्या मदतीकरीता राज्यातील ७०० पोलीस स्टेशनमध्ये महिला मदत कक्ष स्थापन करण्याची कार्यवाही सुरू आहे.

ग) दिनांक २५/०८/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात ४५ अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षांची स्थापना करण्यात आली आहे. सदर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षांच्या बळकटीकरणासाठी निधी वितरित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

घ) महिला व बालकांचे सायबर गुन्ह्यांपासून प्रतिबंध करण्यासाठीच्या उपाययोजनांतर्गत मुंबई येथे प्रशिक्षण व न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा स्थापन करण्यात आली आहे.

ङ) राज्यातील ८ प्रादेशिक न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळांमध्ये डिएनए विश्लेषण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गर्ल्स इस्लामिक फाउंडेशन या जमाते-ए-इस्लामी हिंद (नॉर्थ-वेस्ट) गटाने नागपूरमध्ये हिंदू महिला व अज्ञान मुलींना धाक दाखवून जबरदस्तीने हिजाब घालण्यास बाध्य करण्याचा प्रयत्न केल्याबाबत

**(११) ११०८८ (२३-११-२०२१) श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.चंदूभाई पटेल :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गर्ल्स इस्लामिक फाउंडेशन या जमाते-ए-इस्लामी हिंद (नॉर्थ-वेस्ट) गटाने नागपूरमध्ये मा.मुख्यमंत्र्यांच्या बंगल्याच्या परिसरात हिंदू महिला व अज्ञान मुलींना धाकदपटशा दाखवून जबरदस्तीने हिजाब घालण्यास बाध्य करण्याचा प्रयत्न केल्याचे दिनांक ४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संघटनेकडून वाटले जात असलेले पॅम्प्लेट, वाहन क्रमांक व चित्रफीतीसह तक्रार महिलांनी नागपूरमधील सदर पोलीस ठाण्यात नोंदवली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कायदाविरोधी कृत्य करणाऱ्यांविरोधात गंभीर स्वरुपाच्या संबंधित कलमांन्वये गुन्हे दाखल करावेत, त्यांना अटक करावी, या समाजविघातक कृत्यामागे असलेल्या संघटना व पदाधिकाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्याविरुध्दही फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १३ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या पत्राद्वारे शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर पोलिसांनी किती जणांना अटक करुन त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१५-१२-२०२१) :** (१) मा.मुख्यमंत्र्यांच्या बंगल्याच्या परिसरात हिंदु महिला व अज्ञान मुलीना धाकदपटशा दाखवून जबरदस्तीने हिजाब घालण्यास बाध्य करण्याच्या प्रयत्न केला हे खरे नाही.

(२) पोलीस स्टेशन सदरच्या हद्दीत मा.मुख्यमंत्री निवासस्थान समोरील वॉकर्स रोडवर वॉक करणाऱ्या मुलींना काही मुस्लीम महिला जबरदस्तीने हिजाब घालण्यास बाध्य करीत असल्याबाबत बजरंग दल नागपूरचे सह संयोजक यांनी लेखी अर्ज दिला होता.

(३) सदर घटनेसंदर्भातील मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे पत्र प्राप्त झाले आहे.

(४) प्राप्त तक्रारीच्या चौकशीत जमात-ए-इस्लामी हिंद नॉर्थ वेस्ट नागपूर अंतर्गत गर्ल्स इस्लामिक ऑर्गनायझेशनच्या स्वयंसेवी संस्थेशी संबंधित मुस्लिम महिलांकडे चौकशी केली असता त्या दिवशी हिजाब दिवस असल्याने महिलांना हिजाब बाबत माहिती देऊन त्यासंबंधातील पत्रक दाखवित असल्याची माहिती दिली.

जमात-ए-इस्लामी हिंद नॉर्थ वेस्ट नागपूर संघटनेचे अध्यक्ष व पदाधिकारी यांना यापुढे कोणत्याही प्रकारचे कार्यक्रम विनापरवानगी घेऊन कोणताही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी फौजदारी प्रकिया संहिताचे कलम १४९ प्रमाणे नोटीस देण्यात आली आहे.

सदर प्रकरणी कोणत्याही महिलांना धाकदपटशा दाखवून जबरदस्तीने हिजाब घालणेस बाध्य केल्याबाबत कोणत्याही मुलींनी तक्रार दाखल केलेली नसल्याने गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही व कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लाखांदूर (जि.भंडारा) तालुक्यातील तलाठी कार्यालय इमारतीचे बांधकाम करण्याबाबत

**(१२) ११२७० (२३-११-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाखांदूर (जि.भंडारा) तालुक्यातील ११ तलाठी कार्यालये इमारतीअभावी अनेक वर्षापासून रुपये २०० ते ३०० भाड्याने खाजगी घरात सुरु असल्याचे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील २५ तलाठी सजा कार्यालये आहेत त्यापैकी १४ तलाठी कार्यालयांच्या इमारतींचे बांधकाम करण्यात आले असून उर्वरित ११ तलाठी कार्यालयांच्या इमारत बांधकामासाठी आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी तालुक्यातील नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ११ तलाठी कार्यालयाच्या इमारती बांधण्यासाठी शासनाकडून कोणत्याही निधीची तरतुद करण्यात आली नसल्याने इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तलाठी कार्यालयाची इमारत बांधून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०७-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे.

लाखांदूर तालूक्यात एकूण ३० तलाठी कार्यालय असून त्यापैकी १० इमारती शासकीय आहेत व २० तलाठी कार्यालय खाजगी जागेत सुरु आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) जिल्हाधिकारी, भंडारा यांच्या अहवालानुसार तलाठी कार्यालय इमारत बांधकामाकरीता विभागीय आयुक्त, नागपूर यांचे मार्फत शासनास प्रस्ताव सादर करण्याची बाब कार्यवाहीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

___

## डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील रोजंदार मजुराची रिक्त पदे सेवाज्येष्ठतेनुसार भरण्याबाबत

**(१३) ११२८७ (२३-११-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ येथील रोजंदार मजुरांची सेवाज्येष्ठतेनुसार रिक्त पदे भरण्याबाबत दिनांक २७ जून, २०१८ रोजी तत्कालीन मा.कृषी मंत्री तथा अध्यक्ष कृषी परिषद यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बैठकीत ठराव क्र.३७/९३/२०१८ अन्वये डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाअंतर्गत मजुरांची रिक्त पदे सध्या कार्यरत असलेल्या रोजंदार मजुरांमधून सेवाज्येष्ठतेने भरण्याकरीता कृषी विद्यापीठाकडून प्राप्त झालेली रोजंदार मजुर सेवाज्येष्ठता यादीस मान्यता देण्यात येऊन शासनास शिफारस करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने विद्यापीठ पत्र दिनांक ७ जुलै, २०१८ नुसार विद्यापीठातील रोजंदार मजुरांना मजुरांच्या रिक्त जागांवर सेवाज्येष्ठतेने भरणेकरीता मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव उपसचिव (६-अे) कृषी व पदुम विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई यांना सादर करण्यात आला, परंतु सदर प्रकरणी अद्याप शासनाकडून कुठलीही निर्देश प्राप्त झालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यापीठातील रोजंदार मजुरांच्या ज्येष्ठता यादीनुसार मजुर संवर्गाची रिक्त असलेली ६३० पदे भरण्यास मंजुरी देण्यात यावी अथवा शासन निर्णय दिनांक १६ ऑक्टोबर, २०१२ नुसार वनविभाग सामाजिक वनीकरण व वनमंडळातील रोजंदार मजुराच्या प्रदीर्घ सेवेचा विचार करुन अधिसंख्य वन मजुरांची पदे निर्माण करुन सदर रोजंदार मजुरांनी प्रतिवर्षी २४० दिवस अशी ५ वर्षांची सेवा पूर्ण केली आहेत अशा रोजंदार मजुरांना नियमित करण्याचा निर्णय घेतलेला आहे त्याच धर्तीवर विद्यापीठातील

रोजंदार मजुरांच्या ज्येष्ठता यादीनुसार मजुर संवर्गाची रिक्त असलेली ६३० पदे भरण्यास मंजुरी देण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१६-१२-२०२१) :** (१) होय, खरे आहे.
(२) होय, खरे आहे.
(३) व (४) कृषी विद्यापीठांतील रोजंदार मजुर, कुशल व अकुशल कर्मचाऱ्यांना सेवेत कायम/नियमित करण्याबाबत कृषी विभागाच्या शासन निर्णय २४ जुलै, २०१५ अन्वये कार्यवाही पूर्ण झाली असल्याकारणाने सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आलेला आहे.

विद्यापीठांतील रोजंदारी मजुरांच्या सेवाजेष्ठता यादीस मान्यता देण्याची बाब विद्यापीठाच्या अखत्यारितील असून याबाबत विद्यापीठास कळविण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईतील पुलाच्या बांधकामामुळे बाधित झालेल्या मच्छिमार बांधवांना मदत देण्याबाबत

**(१४) ११३०१ (२३-११-२०२१) श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नवी मुंबई येथील वाशी ते मानखुर्द मार्गावर नव्याने बांधण्यात येणाऱ्या चौथ्या पुलामुळे बाधित होणाऱ्या मच्छिमार बांधवांना नुकसान भरपाई मिळणेबाबतचे निवेदन लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, मत्स्यव्यवसाय विकास विभाग यांना दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या आदेशाने मुंबई महानगरविकास प्राधिकरण महसूल व मत्स्यव्यवसाय खात्याच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी केली, परंतु यामध्ये नवी मुंबईतील ऐरोली, दिवा, घनसोली, कोपरखैरणे, तळवली, करावे, सारसोळे, कुकक्षेत व शिरवणे या गावातील मच्छीमार बांधवांना सर्व्हे मधून वगळण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व्हे मधून वगळण्यात आलेल्या उपरोक्त गावातील मच्छीमार बांधवांनी सदर पुलाच्या बांधकामाला विरोध केला असून येथील बाधित मच्छीमार बांधवांचा पुन्हा सर्व्हे करुन नुकसान भरपाई देण्याची मागणी स्थानिक मच्छिमारांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नवी मुंबईतील पुलाच्या बांधकामामुळे बाधित झालेल्या मच्छिमार बांधवांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (२४-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) नवी मुंबईतील पुलाच्या बांधकामामुळे बाधित झालेल्या मच्छिमार बांधवांना मदत देण्याबाबत आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४/०९/२०२१ रोजी समिती गठित करण्यात आली असून याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## देगलूर (जि.नांदेड) शहराच्या गांधी चौक परिसरात कोचिंग क्लासेसचे असलेल्या ठिकाणी समाजकंटकांकडून विद्यार्थीनी व महिलांची छेडछाड व विनयभंग होत असल्याबाबत

**(१५) ११३०२ (२३-११-२०२१) श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देगलूर (जि.नांदेड) शहराच्या गांधी चौक परिसरात कोचिंग क्लासेसचे केंद्र बिंदू असलेल्या ठिकाणी विद्यार्थीनी व महिलांची छेडछाड व विनयभंग समाजकंटकांकडून होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक पोलिसांत तक्रार करुनही पोलिसांकडून समाजकंटकांविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात येत नसल्याने छेडछाडीचे प्रमाण वाढत असून विद्यार्थींनी व महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महिलांची छेडछाड व विनयभंग करणाऱ्या समाजकंटकांवर तसेच समाजकंटकांवर कारवाई करण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१७-१२-२०२१) :** (१) विद्यार्थींनी व महिलांची छेडछाड व विनयभंग होत असल्याबाबत माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान पोलीस स्टेशन, देगलूर येथे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) व (३) देगलूर शहरातील शाळा, कॉलेज, कोचिंग क्लासेस व इतर ठिकाणी महिला पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे पथकामार्फत नियमित पेट्रोलिंग करण्यात येते. विद्यार्थींनी व महिलांची छेडछाड व विनयभंग होत असल्याबाबत माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान पोलीस स्टेशन, देगलूर येथे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्याविरूध्द कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दिग्रस (जि.यवतमाळ) तालुक्यातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१६) ११३१२ (२४-११-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिग्रस (जि.यवतमाळ) तालुक्यातील सिंगल, लिंगी, हमला, कळगाव, विठोली, साखरा येथील पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये पशुवैद्यकीय अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक मुख्यालय येथे अनुपस्थित राहून तसेच जनावरांना लस

दिल्याच्या दिखावा करुन पंचायत समितीतून लस दिल्याचे पैसे वसूल करत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दिग्रस तालुक्यातील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (१०-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

पंचायत समिती, दिग्रस, जि.यवतमाळ तालुक्यात एकूण ११ श्रेणी-२ चे पशुवैद्यकीय दवाखाने आहेत. यापैकी नमुद लिंगी, हमला, कळगाव, वाठोली या श्रेणी-२ दवाखान्यातील मंजूर पशुधन पर्यवेक्षक ही पदे माहे जून, २०२१ पासून रिक्त असून, सदर दवाखान्यांचा अतिरीक्त कार्यभार नजीकच्या दवाखान्यांतील अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेला आहे. साखरा हे गाव लिंगी पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ यांचे कार्यक्षेत्रात येते, तसेच सिंगल पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ येथे नियमित पशुधन पर्यवेक्षक हे पद भरलेले असून याद्वारे कार्यक्षेत्रात नियमितपणे पशुवैद्यकीय सेवा पुरविल्या जातात.

तसेच सदर तालुक्यातील पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती द्वारे माहे जून, २०२१ ते सप्टेंबर, २०२१ दरम्यान नमुद पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये पुढीलप्रमाणे लसीकरण करण्यात आले असून याबाबतचे लसीकरण सेवाशुल्क शासन खाती जमा करण्यात आले आहे -

| पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ | घटसर्प | एकटांग्या | आंत्रविषार | एकूण जमा सेवाशुल्क |
|---|---|---|---|---|
| पवैद, श्रेणी-२, सिंगद | १०४५ | ५०० | ३८५ | १९३० |
| पवैद, श्रेणी-२, लिंगी | ६०० | ६०० | १०० | १३०० |
| पवैद, श्रेणी-२, आमला | २०० | २०० | ०० | ४०० |
| पवैद, श्रेणी-२, कलगाव | १०४५ | २०० | ०० | १२४५ |
| पवैद, श्रेणी-२, विठोली | ८०० | ४० | ०० | १२०० |

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्ह्यात शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अनुदानात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१७) ११३१५ (२३-११-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यात शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठीचे आर्थिक अनुदानामध्ये बनावट कार्यक्रम व कागदपत्र दाखवून संबंधित कृषी अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी यवतमाळ जिल्हा अधीक्षक कार्यालयातील कृषी अधिकारी, जिल्हा मृदुसंधारण चाचणी अधिकारी तसेच यवतमाळ येथील कृषी मित्र बहुउद्देशीय संस्था यांनी संगनमताने सन २०१५ ते २०२० या कालावधीमध्ये किमान रुपये १३ लाखांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१६-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन जिल्हा मृद सर्वेक्षण मृद चाचणी अधिकारी, यवतमाळ तसेच १ कृषी पर्यवेक्षक व ५ कृषी सहायक यांना निलंबित करण्यात आले असून त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे.

कृषी मित्र बहुउद्देशिय संस्था, यवतमाळ तसेच तत्कालीन जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी यवतमाळ व इतर अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द पोलीस ठाणे, यवतमाळ येथे एफ.आय.आर. नोंदविण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जिल्ह्यांमध्ये रेती घाट व डम्पिंग यार्डवर सीसीटीव्ही कॅमरे लावण्याबाबत

**(१८) ११३२९ (२३-११-२०२१) श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रेती तस्करीतून कोट्यवधीचे व्यवहार होत असल्याने शासनाने रेती तस्करावर देखरेख (अंकूश) ठेवण्यासाठी रेती घाट, रेती वाहून नेण्याचा रस्ता, डंपीग यार्डवर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे आदेश दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास जाहीर केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रेती घाट चालविणाऱ्या रेती माफियांशी आर्थिक संगनमत असल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी सदरहू शासन आदेशाची अंमलबजावणी केली नसल्याचे माहे सप्टेंबर २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणातील दोषींवर कारवाई करुन राज्यातील रेती घाट व डम्पिंग यार्डवर सीसीटीव्ही लावण्याबाबत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०७-१२-२०२१) :** (१) वाळू/रेती निर्गती धोरण, दिनांक ०३/०१/२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार प्रत्येक वाळूगटाच्या ठिकाणी छायाचित्रण होण्यासाठी लिलावधारकामार्फत सीसीटीव्ही बसविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.
(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्ह्यातील गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू उपसा सुरु असल्याबाबत

**(१९) ११३३७ (२३-११-२०२१) श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील गोदावरी नदीपात्रातील पाण्याची पातळी कमी झाल्याचा फायदा घेऊन वाळूमाफियांनी अवैध वाळू उपसा सुरु केल्याचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अवैध वाळू उपस्याकडे संबंधित महसूल विभाग दुर्लक्ष करीत असल्याने शासनाचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाळू माफिया व अवैध वाळू उपसाकडे दुर्लक्ष करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१०-१२-२०२१) :** (१), (२) व (३) गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्याकरीता जिल्हा, उपविभाग व तालुका स्तरावर भरारी पथकाची स्थापना करण्यात आली आहे. सदर पथकामार्फत नांदेड जिल्हयात माहे एप्रिल, २०२१ ते माहे ऑक्टोबर, २०२१ या कालावधीमध्ये १३९ प्रकरणामध्ये रुपये २०५.३६ लक्ष एवढी दंडात्मक कारवाई करून रुपये १६९.१८ लक्ष एवढ्या रकमेची वसूली करण्यात आली आहे. तसेच १४ वाहनांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

नांदेड जिल्हयातील गोदावरी नदीपात्रातील अवैध गौण खनिज उत्खनन करीत असलेले १० बोटी जिलेटीनच्या सहाय्याने स्फोट करून नष्ट करण्यात आल्या असून २ बोटी जप्त करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे कडवे खुर्द केळेवाडी (ता.पाटण, जि.सातारा) येथील इनामी जमीन हडप केल्याबाबत

**(२०) ११४२२ (०६-१२-२०२१) श्री.किरण सरनाईक, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कडवे खुर्द केळेवाडी (ता.पाटण, जि.सातारा) येथील सोमाजी चांदजी अहिर यांची सर्व्हे नंबर ५९ व गट नंबर १३९४ मधील डोंगरकडा असलेली ११० एकर इनामी जमीन अनधिकृतरित्या महसूल अधिकाऱ्यांशी संगनमत

करुन गैरव्यवहाराने इनरकॉन इंडिया लिमिटेड व लेगर मशिन कंपनी यांनी घेऊन तेथे पवनचक्की प्रकल्प सुरु केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उक्त प्रकारणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर जमीन मूळ मालकास परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१०-१२-२०२१) :** (१) व (२) मौजे कडवे खुर्द (केळेवाडी) ता.पाटण, जि.सातारा येथील सर्व्हे नं. ५९ क्षेत्र १११ एकर ९ गुंठे या जमीनीचे सन १९४६ ते आजअखेरचे ७/१२ उतारे पाहता सदर जमीन ईनामी असलेबाबत कोणताही उल्लेख दिसून येत नाही.

सदर जमीनीची सन १९९८ मध्ये खरेदी पत्राद्वारे लोगर मशिन ई.ली. कंपनी मुंबई व इनरकॉन इंडीया मुंबई यांना विक्री झाल्याचे दिसून येत आहे. सदर खरेदी पत्रानुसार झालेले फेरफार तहसिलदार पाटण यांच्याकडे पुनर्विलोकन अर्जाद्वारे आव्हानीत करण्यात आले होते. सदर प्रकरणी तहसिलदार पाटण यांनी सर्व संबधीतांना सुनावणीची संधी देवून दिनांक २३/०३/२००४ रोजीच्या अर्जाद्वारे प्रस्तुत पुनर्विलोकन अर्ज फेटाळला आहे. तसेच इनरकॉन कंपनीने शासनाच्या दिनांक १२/०३/१९९८ च्या पवनऊर्जा धोरणानुसार रितसर परवानगी घेवून पवनचक्कयांची उभारणी केल्याचे दिसून येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.